नि.दि.दा.क्र.२७६/२०१२
सुशिला/दगडू
निशाणी – १०७ खाली

**शपथेवर उलटतपास वादींतर्फे श्री. आर. एच. कर्णे वकील यांच्यामार्फत**

३. मला दावा मिळकतीची माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती मुळच्या महादु बाळा रोमन यांच्या मालकीच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मुळ गट ९४ पैकी २ हे. ७३ आर जागा पाजर तलावाकरीता गेली होती. मला मुळ गट क्र. ९४ च्या अभिलेखाबाबत कसलीही पुर्वीची माहीती नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, महादु यांना सुशिला, दगडू व बाळू अशी तीन अपत्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला ही वेळोशी या गावी दावा मिळकतीमध्येच राहते. असे घडले नव्हते की, ३० ते ३५ वर्षांपुर्वी सुशिलाने तीचा हक्क लेखी हक्कसोडपत्राद्वारे सोडला होता. मी माझ्या शपथपत्रामध्ये सांगितलेल्या वाटपाबाबत कुठलाही लेखी वाटपाचा दस्त झाला नव्हता.

५. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ९४ हा दक्षिण उत्तर पट्टी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ९४ च्या उत्तरेला पाझर तलाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ९४ मध्ये बाळू व दगडू यांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बाळू व दगडू यांच्या घरामध्ये अंदाजे ५० फुटांचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांची घरे गट क्र. ९४ च्या दक्षिण – पश्चिम दिशेला कोपऱ्यात आहेत.

६. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला समोर कधी बाळू व दगडू या दोन्ही भावांचे वाटप झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सुशिलाने मला वैयक्तीकरित्या कधी

सांगितले नव्हते की, तीने दावा मिळकतीमधील तीचा हक्क सोडला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या शपथपत्रामध्ये उल्लेख केलेले वाटप कुठल्या तारखेला झाले होते हे मला सांगता येणार नाही. असे म्हणणे बरोबर होईल की, गट क्र. ९४ मध्ये दगडू व बाळू यांची सध्याची वहिवाट ही तोंडी बोलीवर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ९४ मध्ये सुशिला हिचा वारसा हक्क आहे. हे म्हणणे खरे आहे की, तीन्ही बहीन भावांमध्ये आजपर्यंत दावा मिळकतीचे वाटप सरसनिरस मानाने झाले नाही. माझ्या शपथपत्रामध्ये नमूद असलेल्या ३० ते ३५ वर्षांपुर्वी झालेल्या दगडू व बाळू यांच्या वाटपाचा तपशिल मला सांगता येणार नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की, मी मुंबई येथे कापड मील येथे कामाला होतो. मी सन १९८६ ते सन २००३ पर्यंत मुंबई येथे कामाला होतो. हे म्हणणे खरे नाही की, गावी आल्यानंतर मी माझ्या स्वतःच्या जमीनी पहायला लागलो. हे म्हणणे खरे नाही की, ३० ते ३५ वर्षांपुर्वी मी मुंबई येथे कामाला असल्यामुळे माझे गावी आजीबात येणे जाणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला गावामधील परिसराच्या जमीनींची माहीती नव्हती.

८. हे म्हणणे खरे आहे की, श्रीरंग लवंगारे हे माझ्या गावचे असल्यामुळे त्यांच्या सोबत माझे चांगले संबंध आहेत. हे मला माहीती नाही की, लवंगारे व दगडू यांच्या घरच्यांचे सुध्दा चांगले सबंध आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, लवंगारे व दगडू यांच्या घरचांच्या सांगण्यावरुन मी न्यायालयात खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, सुशिला आजपण दावा मिळकतीमध्ये येवुन राहते. हे

म्हणणे खरे नाही की, सुशिला हीची दावा मिळकतीमध्ये आजपण वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुशिला हीला हिस्सा मिळू नये त्यामुळे मी दगडूंच्या वारसांशी संगणमत करुन आज न्यायालयात खोटी साक्ष दिली व खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले.

उलटतपास पुर्ण<br>फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत<br>माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण<br>दिनांक १२/०६/२०२४

(आर. डी. भुयारकर)<br>दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण.